0001 **नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर**

वाचा :- १) सहाय्यक पोलीस निरीक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचेकडून दि.२९/१०/२०११ रोजी प्राप्त झालेले कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७४/२०११/जा. ८६० दि. ०७/११/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७४/२०११/जा.८६०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : ०७/११/२०११.

## अंतरीम आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

दिनांक १५/१०/२०११ रोजी नेरुळ पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक श्री. बबन रेवजी इलग तसेच त्यांचे समवेत पोलिस हवालदार श्री. पावरा बक्कल क्र. ८३८ व पोलिस शिपाई श्री. इथापे बक्कल क्र. २४३६ हे गस्त करीत असतांना सुमारे पहाटे ५:२० वाजता त्यांना त्यांचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक श्री. चाफेकर यांनी समाधान चौका जवळील सार्वजनिक शौचालय, सेक्टर ४, नेरुळ येथे ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ हा उभा असल्याचे सांगून सदरच्या ट्रकमध्ये योगेश शिंदे यांच्या रेशन दुकानातील गहू बाजारात विक्री करण्यासाठी भरलेला आहे, अशी त्यांना बातमीदारामार्फम माहिती मिळालेली असल्याची सांगून सदर ठिकाणी पथकासह येण्यास सांगितले. त्यानुसार सदरचे पथक घटनास्थळी सुमारे पहाटे ५:३५ वाजता पोहचले असता, त्या ठिकाणी वरिष्ठ पोलिस निरिक्षक श्री. चाफेकर व पोलिस हवालदार श्री. नलगे हे हजर होते व त्या ठिकाणी ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ हा उभा असलेला दिसला.

सदरच्या ट्रकमधील मालासंदर्भात पथकाने खात्री केली असता, ट्रकमध्ये गोणीमध्ये गहू भरलेला दिसून आला. त्यासंदर्भात ट्रकमध्ये असलेले चालक नामे समाधान नामदेव खंडागळे तसेच ट्रकमधील दुसरा इसम नामे संतोष विश्वनाथ पवार (क्लिनर) यांचेकडे ट्रकमध्ये असलेल्या गहूबाबत माहिती घेतली असता, ट्रकमधील गहू हा

योगेश शिंदे यांच्या रेशनिंग दुकानातील असून तो गहू बाजारात विक्री करण्यासाठी भरलेला असल्याचे उपस्थित दोन्ही इसमांनी सांगितले. त्यावरुन सदर पथकाने रेशनिंग दुकानदाराचा पत्ता विचारला व त्याच्या राहत असलेल्या घरी जाऊन त्यास घटनास्थळी घेऊन आले व सदर ट्रकमधील असलेल्या गव्हाच्या गोण्या संदर्भात विचारणा केली असता, रेशनिंग दुकानदार याने ट्रकमधील एकूण १९० गोणी गहू असल्याचे सांगून सदरचा गहू हा त्याच्या रेशनिंग दुकानातील असून बाजारात विक्रीसाठी त्याने ट्रकमध्ये भरलेला असल्याचे सांगितले. याबाबत पथकाने खात्री केली असता सदरचा साठा हा रेशनिंग दुकानदार योगेश शिंदे हे अनधिकृतपणे बाजारात गहू विक्रीसाठी घेऊन जात असल्याबाबत खात्री झाल्याने सदर रेशनिंग दुकानदार यांना सोबत घेऊन त्यांच्या स्वस्तिक कॉम्पलेक्स येथील रेशनिंग दुकान क्र. ४१ फ/४३२ या ठिकाणी रेशनिंग दुकानाची खात्री करुन दुकानातील साठा व नोंदवह्यात फेरबदल होऊ नये. तसेच दुकानातील साठ्याची पडताळणी करणे कामी सदर रेशनिंग दुकानाला दोन पंचासमक्ष सिल लावण्यात आले व सर्व संबंधितांचे पंचासमक्ष जबाब नोंदवून घेण्यात आले.

अशाप्रकारे संबंधितानी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा गहू हा गरजू व पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत न करता, अनधिकृतपणे काळ्याबाजाराने विक्री करण्याकरिता घेऊन जात असल्याचे सकृतदर्शनी निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ चा भंग केल्यावरुन नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.क्र. II ७८/२०११ दि.१५/१०/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | लाल व पांढऱ्या रंगाचा ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ | १ नग | ६,००,०००/- |
| २ | उक्त ट्रकमधील १९० गोण्या गव्हाचा साठा (प्रत्येकी ५० किलो वजनाच्या) | ९५०० किलो | १,९०,०००/- |
| | | एकूण | ७,९०,०००/- |

उपरोक्त वस्तूस्थिती पाहता, प्रस्तूत प्रकरणी सुनावणी होऊन सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकुण घेवून अंतिम निकालपत्र देण्यास विलंब लागणार असल्याने व प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला गहू हा पदार्थ नाशवंत असल्याने सदरचा पदार्थ आणखी काही काळ तसाच राहील्यास सदरचा गहू खराब होऊन शासनाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे शिधापत्रिकाधारक त्यांचे देय कोटयापासून वंचित राहू नये म्हणून, तसेच शासन निर्णय क्र. ईसीए-१००९/प्र.क्र.३९९/ना.पु.२३, दि. १३ मे, २०१० अन्वये जप्त

करण्यात आलेला गहू, तांदूळ, तुरदाळ, साखर व पामतेल या जीवनावश्यक वस्तू, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६ (अ) चे पोट कलम २ मधील तरतूदीनुसार शिधावाटप दुकानदारांना द्यावेत व शिधावाटप दुकानदारांनी सदरच्या वस्तू शासननियंत्रित दराने पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरित करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. सबब, प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या गव्हाच्या साठयाबाबत, नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याच्या तपासाच्या तसेच सदर प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्हयाच्या न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून अंतरीम आदेश पारित करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

<u>अंतरिम आदेश</u> :-

१) प्रस्तूत गुन्हा नोंद प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण १९० गोण्यामधील एकुण ९,५०० कि.लो. गव्हाचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेला सदर गव्हाचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे मदतीने त्यांचे कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांना, पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्याकरिता द्यावा व येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) उपरोक्त कार्यवाही करतांना उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांनी उपरोक्त गव्हाचा साठा संबंधित अधिकृत शिधावाटप दुकानांच्या पुढील महिन्याच्या नियतनामध्ये दर्शविण्यात यावा.

४) प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या वरील मुद्देमालाव्यतीरिक्त शिल्लक राहीलेल्या मुद्देमालाबाबतचे आदेश या प्रकरणी सुनावणीची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर निर्गमित करण्यात येतील.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलिसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ हया लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ...MBAI

प्रति,

१) ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ चे चालक, समाधान नामदेव खंडागळे

0004 २) ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ चे क्लिनर, संतोष विश्वनाथ पवार

३) ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ चे मालक

४) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/४३२ चे दुकानदार, योगेश शिंदे

५) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/४३२ चे मालक

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, आदेशात नमुद केल्याप्रमाणे सात दिवसाचे आत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा. सदरच्या कार्यवाहीस विलंब होवून गव्हाचा साठा खराब झाल्यास त्याची जबाबदारी आपल्यावर राहील, याची नोंद घ्यावी.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.